## नियमीत दिवाणी दावा क्र.५३६/२०२१ मधील निशाणी ३० वरील आदेश

(CNR No.MHOS-10001361-2021)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ व ६ ते ९ यांनी त्यांचे विरुध्द नि.क्र.१ खाली दि.२९/०६/२०२२ रोजी झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्य करण्यात येवून कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ व ६ यांचा मुलगा नामे निलेश श्रीराम काळे म्हणजेच प्रतिवादी क्र.७ व ८ चा पुतण्या याचे विरुध्द भूम पोलीस ठाण्यामध्ये गु.र.नं.६७/२०२२ हा दाखल झालेला होता. सदर गुन्हयामध्ये निलेश हा जवळपास ९० ते ९५ दिवस न्यायालयीन कोठडीत होता. सदर गुन्हयात प्रस्तुत प्रतिवादींना देखील वेळोवेळी पोलीस ठाणे, भुम यांनी चौकशी कामी हजर राहण्याच्या सूचना दिलेल्या होत्या व प्रतिवादी देखील हजर राहत होते. त्यामुळे प्रतिवादींना त्यांची कैफियत देणेकामी आवश्यक असणारी कागदपत्रे उस्मानाबाद, भूम व तसेच वाशी येथील न्यायालयातून काढण्यास विलंब लागला. त्यामुळे प्रतिवादी मुदतीत न्यायालयात हजर राहून कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे न्यायालयाने प्रतिवादींविरुध्द दि.२९/०६/२०२२ रोजी विना कैफियत आदेश पारित केला आहे. तरी प्रतिवादींविरुध्द नि.क्र.१ खाली झालेला 'विना कैफियत' चा आदेश रद्य करण्यात येवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

३. वादींनी अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी कोणत्याही कारणाविना उशीराने अर्ज दिला आहे. सदर प्रकरणात प्रतिवादींना समन्स प्राप्त होऊनही त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. अर्जातील कारण सयुक्तिक नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व जर न्यायालय अर्ज मंजूर करण्याचे निष्कर्षाप्रत आले, तर अर्ज प्रतिवादींवर खर्च ठेवून मंजूर करण्यात यावा,

अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.४ व ६ ते ९ यांचेवर दाव्याचे समन्सची बजावणी दि.२५/०२/२०२२ रोजी झाली, ज्यास अनुसरुन ते विधीज्ञांमार्फत न्यायालयासमोर हजर झाले. परंतु त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश–८, नियम–१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आपली कैफियत अभिलेखावर दाखल केली नाही. परिणामास्तव, दि.२९/०६/२०२२ रोजी नि.क्र.१ खाली प्रतिवादींविरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेबाबतचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर प्रस्तुत अर्ज दि.१२/०९/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.

६. प्रतिवादींनी 'विना कैफियत' आदेश रद्य होऊन मिळणेकरिता अर्जात नमूद केलेले कारण सयुक्तिक दिसून येते. तसेच प्रस्तुत दावा हा वाद मिळकतींचे वाटप होऊन कब्जा मिळणेकरिता दाखल करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतली नाही तर दावा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. तसेच नैसर्गिक न्यायाचे तत्वानुसार प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे योग्य ठरेल. करिता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तथापि, अर्ज मंजूर करताना झालेल्या विलंबाकरिता प्रतिवादी क्र.४ व ६ ते ९ यांनी एकत्रीतपणे वादींना समानरित्या खर्च रु.३००/– देणेबाबत आदेशीत करणे योग्य होईल. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो :

## **आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.४ व ६ ते ९ यांनी एकत्रीतपणे वादींना समानरित्या खर्च रु.३००/– द्यावा व त्यानंतर प्रतिवादी क्र.४ व ६ ते ९ यांची कैफियत

(नि.दि.दा. क्र.५३६/२०२१)
(नि.क्र.३० वरील आदेश)

अभिलेखावर घेण्यात यावी.

HANIF MOINUDDIN MOMIN
Digitally signed by HANIF MOINUDDIN MOMIN
Date: 2023.02.16 17:42:47 +0530

दिनांक : १५/०२/२०२३

**( एच.एम. मोमीन )**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
वाशी